## सर्व नागरीकांना आवाहन करण्यांत येत आहे की,

1)सोलापूर जिल्हा परिषदेत नोकर भरती ही वृत्तपत्रात व जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागणी केली जाते. प्राप्त अर्जांची छाननी करुन लेखी परिक्षेव्दारे जागा भरण्यात येतात. सदर भरती प्रकियेत कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा पैशाची मागणी केली जात नाही. परिक्षेव्दारे गुणवत्तेच्या आधारावरच उमेदवारांची निवड केली जाते.

जर एखादी व्यक्ती पैशाची मागणी करुननोकरीचेआमीष दाखवीत असेल तर जिल्हा परिषद प्रशासनाशी संपर्क साधावा.

2) जिल्हा परिषद सोलापूर मार्फत ग्रामिण भागातील नागरीकांना विविध विभागांमार्फत विविध वैय्यक्तीक लाभाच्या योजनांचा लाभ दिला जातो. सदर लाभ हा संबंधित पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद स्तरावरील संबंधित विभागा कडे प्रत्यक्ष प्रस्ताव सादर करुन या प्रस्तावांची शासन निर्णयामध्ये नमूद तरतूदीनुसार छाणनी करुन मंजूर केले जातात. अशा प्रकारचे वैय्यक्तीक लाभाच्या योजना मंजूरीसाठी जिल्हा परिषदेने कोणतेही एजंट नेमलेले नाहीत तरी एखादीव्यक्ती तुमचे काम करुन देतो व पैशाची मागणी करीत असेल अशा वेळी नागरीकांनी जिल्हा परिषद प्रशासनाशी संपर्क साधावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापूर